# कुत्रे हाताळताना

श्वान शिक्षकाचे ऐकतो, पण आमचे म्हणजे श्वानपालकांचे ऐकत नाही, त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागत नाही ही शिकविलेल्या श्वानांच्या पालकांपैकी ९०-९५ % लोकांची तक्रार असते. एवढे पैसे देऊन त्याला शिकविले, पण त्याचा काहीही उपयोग नाही असे त्यांना वाटते. तसे होऊ नये म्हणून द्विरुक्तीचा दोष पत्करून काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे. वनस्पती असोत वा प्राणी, त्यांना विचारांची देवाणघेवाण आवश्यक वाटते. तशी ती होतेही. वनस्पतींच्या पेशीतून उद्‌भवणारी सूक्ष्म कंपने संवादाचे वहन करतात. प्राण्यांचा विचार करायचा तर घोड्यांच्या मनातील विचारांचा परिणाम त्यांच्या कानाच्या हालचालीत होत असतो. ही हालचाल पाहून दुसरे अश्व किंवा घोडेस्वार आपले वजन हलवून घोड्याला आपले विचार कळवत असतात. त्याचप्रमाणे श्वानाला शिकविताना त्याच्याशी श्वानशिक्षक किंवा श्वानपालक कसा संवाद साधतात, यावर त्या संवादाचे यश अवलंबून असते व परिणामी श्वानाचे आज्ञापालनही.